ISSN 2349-638x
Impact Factor 6.293

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL
Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

## SPECIAL ISSUE No. 64

Executive Editor
Dr. S.M. Maner
Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor
Dr. S.M.Deshmukh
Head, Dept. of Marathi
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Chief Editor
Prof. Pramod Tandale

Scanned with CamScanner

No part of this Special Issue shall be copied, reproduced or transmitted in any form or any means, such as Printed material, CD – DVD / Audio / Video Cassettes or Electronic / Mechanical, including photo, copying, recording or by any information storage and retrieval system, at any portal, website etc; Without prior permission.

**Aayushi International Interdisciplinary Research Journal**
**ISSN 2349-638x**
**Special Issue No.64**

**Disclaimer**

Research papers published in this Special Issue are the intellectual contribution done by the authors. Authors are solely responsible for their published work in this special Issue and the Editor of this special Issue are not responsible in any form.

Scanned with CamScanner

Impact Factor - 6.293 ISSN-2349-638x

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

JANUARY – 2020

**Executive Editor**

**Dr. S. M. Maner**
Principal
Tuljabhavani Mahavidyalaya, Tuljapur,
Dist. Osmanabad (M. S.) India

**Chief Editor**

**Pramod P. Tandale**

**Co-Editor**

**Dr. S. M. Deshmukh**

Head, Dept. Marathi

**Tuljabhavani Mahavidyalaya, Tuljapur, Dist. Osmanabad (M.S.) India**

**IMPACT FACTOR**

**SJIF 6.293**

For details Visit our website

www.aiirjournal.com

Scanned with CamScanner

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Impact Factor – 6.293

Special Issue 64 Editorial Board

## Advisory Board

**Prin. Dr. Milind Hujare**, Vasantrao Dada Patil Mahavidyalaya, Tasgon

Prin. Dr. Anil Patil, A. K. M. M. Ichalkaranji

**Prin. Dr. Babasaheb Dudhale**, Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya, Pen

**Prin. Dr. Samad Shaikh**, Ex Principal, Vasantrao Naik College, Aurangabad

**Prin. Dr. S. Y. Hongekar**, Vivekanand College, Kolhapur

**Prin. Dr. R. R. Kumbhar**, Dattajrao Kadam Mahavidyalaya, Ichalkaranji

**Prin. Dr. S. B. Kurane**, Samajbhushan Ganpatrao Kalbhore Mahavidyalaya, Lonikalbhore

## Review Committee

### Dept. of Marathi

Prin. Dr. Haridas Phere, Dhoki

Dr. Shirish Landage Patil,Newasa

Dr. D. R. Gaikwad, Solapur

Dr.Nanasaheb Suryawanshi, Loha

### Dept. of Hindi

Dr. Arjun Chavan, Kolhapur

Dr. D. Y. Ingale, Osmanabad

Dr. Ashok Marde, Tuljapur

Dr. M. R. Ade, Tuljapur

### Dept. of English

Ex Prin. Dr. F. A. Siddikui, Bidkin

Dr. S. S. Kanade, Murum

Dr. C. R. Dapke, Tuljapur

Dr. Farjana M. Tamboli, Tuljapur

Scanned with CamScanner

| Sr No | Author Name | Title of Article / Research Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 100 | डॉ . सुरेश विनायक जाधव<br>सौ. शिल्पा जितेंद्र शिवभक्त | भाषा आणि सोशल नेटवर्किंग | 270 |
| 101 | डॉ.श्रीकांत श्रीधर कामतकर | वैद्यकीय पेशा : मराठी भाषा : उपयोजन व रोजगाराच्या संधी। | 276 |
| 102 | डॉ.शिवाजी नारायणराव शिंदे | मराठी भाषा अभ्यासाच्या प्रशासनातील रोजगाराभिमुख संधी | 280 |
| 103 | प्रा. राजकुमार पवार | मराठी भाषा अभ्यासातून रोजगाराची संधी उपलब्धकरून देणारे मुलाखत तंत्र | 283 |
| 104 | प्रा. नाना त्र्यंबक घुगे | भाषा अभ्यासाच्या रोजगाराभिमुख संधी | 286 |
| 105 | प्रा. जवाहर मोरे | मराठी भाषा आणि रोजगार | 294 |
| 106 | आफताब मुजावर | भाषा आणि रोजगाराच्या संधी<br>( वृत्तपत्र रेडिओ, दूरदर्शन | 296 |
| 107 | श्री. संतोष मारुती लोंढे | फिचर रायटिंग आणि करिअर | 298 |
| 108 | डॉ. अमजद हारूण अत्तार | मराठी भाषा आणि रोजगाराच्या विविध संधी | 302 |
| 109 | डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात | स्पर्धा परीक्षा : मराठीच्या विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी | 304 |
| 110 | डॉ. एम. के. शिंदे | मराठी भाषा व प्रसारमाध्यमातील पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ | 306 |
| 111 | प्रा. डॉ. तुळशीराम चंद्रशेन उकिरडे | रोजगाराभिमुख कीर्तन : नवा अध्याय | 309 |
| 112 | प्रा.डॉ.दत्तात्रय प्रभाकर डुंबरे | प्रसारमाध्यमे व भाषिक कौशल्य उपयोजन | 311 |
| 113 | प्रा. डॉ. वृंदा विजय देशपांडे | भाषा व प्रसारमाध्यमे - रोजगार संधी | 314 |
| 114 | प्रा. डॉ. रमेश तु. देशमुख | भाषा आणि प्रसारमाध्यमे | 319 |
| 115 | प्रा. जितेंद्र बाबुराव शेजवळ | प्रसार माध्यमे आणि समाज | 321 |
| 116 | प्रा. डॉ. जी. व्ही. शिंदे | मराठी भाषा अभ्यासाच्या रोजगाराभिमुख संधी | 323 |
| 117 | डॉ. एन. डी. चौधरी | मराठी भाषेतील प्रसारमाध्यमासाठी लेखन कौशल्ये | 325 |
| 118 | डॉ. दयानंद लिंबाजी भोवाळ | भाषा आणि प्रसार माध्यमे (मुद्रित व दृश्य माध्यमे) | 328 |
| 119 | डॉ. राखी सिद्राम सलगर | भाषा व प्रसार माध्यमे | 331 |
| 120 | डॉ.दीपक सुभाषराव सूर्यवंशी | प्रसार माध्यमांसाठी लेखन कौशल्य विशेष संदर्भ: जाहिरात | 333 |




Scanned with CamScanner

# स्पर्धा परीक्षा : मराठीच्या विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी

डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात
सहाय्यक प्राध्यापक
मराठी विभाग
किसन वीर महाविद्यालय, वाई

**प्रस्तावना**

आपल्या देशाने ९० च्या दशकात खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण म्हणजेच 'खाऊजा' हे धोरण स्वीकारल्यामुळे जग अगदी आपल्या जवळ आले त्यामुळे जागतिक बाजारात तरूणांचा देश असणाऱ्या भारताला अनेक संधी निर्माण झाल्या. भाषेचा विद्यार्थी; आपले साहित्य, परंपरा, संस्कृती या माध्यमातून जगभरात पोहोचवू शकतो तसेच 'खाऊजा' धोरणामुळे वृत्तपत्र आकाशवाणी व दूरदर्शन या प्रसारमाध्यमांतील रोजगारांच्या संधीही वाढलेल्या आहेत या बरोबरच स्पर्धा परीक्षा देऊनही भाषेच्या विद्यार्थ्यांना करिअर करता येते. जागतिकीकरणाबरोबरच इतर अनेक कारणांमुळे नोकरी व्यवसायाच्या क्षेत्रात संधी निर्माण झालेल्या आहेत. या अगोदर कला शाखेचा पदवीधर बी.एड., एम.एड., बी.लिब., एम.लिब., पत्रकारिता, नाट्यशास्त्र अशा विद्याशाखांकडे वळत होता परंतु सद्या अनेक शाखा भाषेच्या विद्यार्थ्यांला खुणावत आहेत

**प्रसारमाध्यमांतील रोजगाराच्या संधी**

लोकशाही व्यवस्थेत प्रसारमाध्यमांना महत्वाचे स्थान आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना 'लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ' म्हटले आहे. छापील माध्यमांमध्ये दैनिके, पाक्षिके, मासिके, भित्तीपत्रके, हस्तपत्रे येतात. वृत्तपत्रे ही तर आपली सामाजिक व सांस्कृतिक गरज आहे या छापील माध्यमांमध्ये मराठी भाषेचा विद्यार्थी स्तंभ लेखन वृत्त लेखन समीक्षात्मक लेखन मुलाखत लेखन करू शकतो. तसेच हे युग माहिती तंत्रज्ञानाचे असल्याने जगभर घडणाऱ्या विविध घटनांची माहिती आपल्या पर्यंत पोहोचत असते. ही माहिती पोहोचविण्यात आकाशवाणी हे श्राव्य व दूरचित्रवाणी हे दृकश्राव्य माध्यम अत्यंत प्रभावी आहे यामध्येही आपल्या विद्यार्थ्यांना उद्घोषक, निवेदक, वृत्तसंपादक म्हणून काम मिळू शकते तसेच तो संगीत समीक्षा, चित्रपट समीक्षा, नाट्य समीक्षा करूनही आर्थिक प्राप्ती साधू शकतो.

**स्पर्धा परीक्षा रोजगाराची एक प्रभावी संधी**

आपल्या समाजामध्ये शिक्षणाचा संदर्भ थेट नोकरीशी जोडला जातो. त्यामुळे मराठी विषय घेऊन बी.ए.,एम.ए. करताना हा संदर्भ जोडणे अपेक्षितच आहे मराठी विषयातून शिक्षण घेतल्यानंतर कोणकोणत्या क्षेत्रांमध्ये जीवन घडविता म्हणजेच करिअर करता येते हा विद्यार्थ्यांकडून नेहमी विचारला जाणारा प्रश्न असतो. अशा वेळी स्पर्धा परीक्षांची (एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी) योग्य माहिती देऊन त्यांच्या मध्ये आत्मविश्वास भरल्यास त्यांना रोजगाराची संधी नक्कीच मिळू शकते

एम.पी.एस.सी. सारख्या स्पर्धा परीक्षांसाठी मराठी विषय अनिवार्य आहे महाराष्ट्रातील विद्यार्थी कोणत्याही शाखेचा असला तरी त्याची मातृभाषा मराठीच असल्याने तो हाच विषय निवडतो. यातून त्याला आपल्या भाषेचे कितपत ज्ञान आहे हे पाहिले जाते. विद्यार्थी कोणत्याही शाखेचा असला तरी त्याला मराठी साहित्याचा व व्याकरणाचा नव्यानेच अभ्यास करावा लागतो. यु.पी.एस.सी परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनाही इंग्रजी आवश्यक असले तरी त्याबरोबर आपल्या राज्यघटनेने प्रमाणभूत मानलेल्या बावीस भाषांपैकी कोणतीही एक भाषा घेणे सक्तीचे असते महाराष्ट्रातील विद्यार्थी साहजीकच मराठीची निवड करतो. परंतु त्याला बोलण्या व ऐकण्या पलीकडे मराठीचे सखोल ज्ञान असतेच असे नाही. ते ज्ञान मराठी विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांस जर - त्याने प्रमाणिकपणे अभ्यास केलेला असेल तर नक्कीच असते. फक्त आपल्या विद्यार्थ्यांनी न्यूनगंड झटकून या परीक्षांना सक्षमपणे तोंड दिले तर त्याला नक्की यश मिळू शकते असे मला वाटते.

**स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम**

राज्यसेवेची जी परीक्षा घेतली जाते त्या परीक्षेचा हेतू उमेदवाराचे भाषिक ज्ञान अभिव्यक्ती, आकलन क्षमता, लेखन आणि संवाद कौशल्याच्या जाणिवांचा स्तर पडताळणे हा असतो माझे स्पष्ट मत आहे की मराठी माध्यमातून शिकणाऱ्या मुलांचा हा स्तर इतर मुलांपेक्षा उच्च असतो निबंध, पत्र, अहवाल व सारांश लेखन, संवाद कौशल्य असा अभ्यासक्रम लेखनामध्ये व आकलनामध्ये इंग्रजी उताऱ्याचे सुबोध मराठीत भाषांतर, प्रमाणीत भाषेतील उताऱ्या वरील प्रश्नांची उत्तरे लिहिणे हा भाग आहे तसेच व्याकरणामध्ये शब्दांच्या जाती, वाक्यप्रकार, काळ, वाक्प्रचार, म्हणी, पारिभाषिक शब्द या घटकांचा अभ्यासक्रमात समावेश आहे. हा अभ्यासक्रम पाहिल्यावर एक लक्षात येते की, जर मराठीच्या शिक्षकाने तळमळीने शिकविले तर विद्यार्थ्यांचे भविष्य नक्कीच घडू शकते. उदाहरणादाखल हा प्रश्न पहा 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ म्हणजे' (प्र.क्र.97, एम.पी.एस.सी. मुख्य परीक्षा

2012) याचे उत्तर 'आपल्या माणसांच्या नाशास आपणच कारण' असे उत्तर मराठीचा विद्यार्थी सहज देईल कारण त्याने काव्यशास्त्रात शब्दशक्तींचा (अभिधा, लक्षणा, व्यंजना) अभ्यास केलेला असतो. अशाप्रश्नांचे त्यांना लवकर आकलन होऊ शकते.

**स्पर्धा परीक्षांचे तंत्र**

मराठीचा विद्यार्थी अशा परीक्षांमध्ये यशस्वी होऊ शकतो हे माझे ठाम मत असले तरी, अशा परीक्षांचे तंत्र विद्यार्थ्यांनी आत्मसात करुन काही क्लृप्त्या वापरणे व तर्काचा वापर करणे गरजेचे आहे त्यासाठी अवांतर वाचन, पर्यटन, लोकांशी संवाद साधणे, सततचे चिंतन, मनन व गटचर्चेत भाग घेणे सातत्याने व्हायला पाहिजे. यशस्वी होण्यासाठी प्रा. दामोदर मोरे यांनी विद्यार्थ्यांसाठी पंचशील दिली आहे ती अशी- 'हा देश अखंड राहावा आणि समाजात कायम एकात्मता नांदावी म्हणून मी तुम्हाला पाच प्रतिज्ञा देत आहे. हवं तर तिला आचारसंहिता म्हणा किंवा विद्यार्थ्यांसाठी पंचशील म्हणा

1. देशाच्या आणि समाजाच्या हितासाठी समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचे मी काटेकोरपणे आणि प्रामाणिकपणे पालन करेन अशी मी प्रतिज्ञा करतो.
2. मराठी भाषा ही ज्ञानभाषा व्हावी यासाठी आणि मराठी समाज, साहित्य आणि संस्कृती यांच्या अभिवृद्धीसाठी मी सजगपणे सतत प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा करतो.
3. शारीरिक, मानसिक आणि वैचारिकदृष्ट्या मी कुणाचाही गुलाम होणार नाही आणि मानवी मूल्यांचा मी पहारेकरी असल्याने कुणालाही गुलाम न करता, कुणालातरी गुलाम करू पाहणाऱ्यांनारोखेन अशी मी प्रतिज्ञा करतो.
4. मी कुणावरही कोणत्याही स्वरूपाचा अन्याय किंवा कुणाचेही शोषण करणार नाही आणि माझे कुणी शोषण करण्याचा किंवा माझ्यावर अन्याय करण्याचा प्रयत्न झाल्यास मी तो सहन करणार नाही अशी मी प्रतिज्ञा करतो.
5. मी देशभक्त असल्याने माझ्या लाडक्या मातृभूमीवर आणि मी राष्ट्रभक्त असल्याने मातृभूमीवर राहणाऱ्या सर्व स्तरातील सर्व मानवी समुहांवर सारखेच प्रेम करण्याची आणि त्यांच्याशी भाऊ आणि बहीण म्हणून वागून त्यांचे रक्षण करण्याची मी प्रतिज्ञा करतो.[१] ही पंचशील आत्मसात करुन विद्यार्थ्यानि अभ्यास केल्यास त्याला नक्कीच यश मिळू शकते अशा धडपडणाऱ्या तरुणाईला संदेश देताना ज्ञानेश्वर मुळे म्हणतात,"तुमची स्वप्नं मरू देऊ नका तुमचा ध्येयवाद सोडू नका, तुम्हाला देशसेवा करायचीय ना, तर मग देशाशी आणि समाजाशी असणारा संपर्क तोडू नका, तुमच्या कामात तुम्हाला तुमच्या स्वप्नांचं आणि ध्येयवादाचं दर्शन घडू दे! माय विसरू नका, माती विसरू नका, मातृभाषा विसरू नका."[२]

**समारोप**

मराठी भाषा या इंटरनेटच्या जंजाळात टिकेल का? वाचन संस्कृतीचे काय? मराठीचे भवितव्य धोक्यात? असे अनेक प्रश्न आजचे विचारवंत निर्माण करीत आहेत, पण मला असे वाटते की, जोपर्यंत खेड्यात राहणारा माणूस जिवंत आहे तोपर्यंत ज्ञानदेवांच्या व तुकोबांच्या भाषेला मरण नाही फक्त नवी आव्हाने ओळखून इंग्रजीचा मत्सर न करता आपल्या मातृभाषेतील सत्त्व आत्मसात करुन तरुणांना स्वतःचे व्यक्तिमत्त्व संपन्न करुन घेता येईल विद्यार्थ्यांनी असा सकारात्मक दृष्टिकोन ठेवला तर मराठी विषयाकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन बदलून नवा दृष्टिकोन तयार व्हायला मदत होईल असे मला वाटते

**संदर्भ टीपा:-**

१. मोरे दामोदर : अस्मितादर्श, जाफेमा/२०११, (लेख), 'युवा साहित्य संमेलन ठाणे, प्रमुख भाषण', पृ. क्र. ३५.
२. मुळे ज्ञानेश्वर : साधना, १२ फेब्रुवारी २०११, (लेख), ' स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलनात ज्ञानेश्वर मुळे यांनी केलेले भाषण, पृ. क्र. ८.



Scanned with CamScanner